# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

(पोलीस वार्तापत्र)

(सायंकाळ)

**दिनांक ०१.०९.२०२६ मंगळवार**

**१) परिमंडळ क्र. ४ अंतर्गत किमती ६९,५७,०००/— रु. चा मुद्येमाल त्यांचे मुळ मालकांना परत :—**

आगामी सण उत्सवांचे पार्श्वभुमीवर, नागपूर पोलीस आयुक्तालयाच्या परिमंडळ क्र. ४ अंतर्गत विविध पोलीस ठाणे हद्यीतील चोरीस गेलेले तसेच गहाळ झालेले मोबाईल, सोने—चांदीचे दागिने व दुचाकी वाहने असा मुद्देमाल त्यांचे मुळ मालकांना दिनांक ०१.०९.२०२६ चे १८.०० वा. पोलीस ठाणे नंदनवन येथे मा. श्री. विश्वास नांगरे पाटील पोलीस आयुक्त, नागपुर शहर यांचे हस्ते परत करण्यात आला.

परिमंडळ क्र. ४ अंतर्गत पो. ठाणे नंदनवन, सक्करदरा, ईमामावाडा, अजनी, हुडकेश्वर व बेलतरोडी अशा ०६ पोलीस ठाणे येथील तपासी अधिकारी व अंमलदार यांनी वेगवेगळ्या गुन्ह्याचे तपासादरम्यान, चोरीस गेलेला, गहाळ झालेला मुद्देमाल हस्तगत केला. हस्तगत मुद्येमालापैकी १५ सोन्या—चांदीचे दागिने, ११ दुचाकी वाहने व १७२ मोबाईल फोन असा एकूण १९८ मद्देमाल कि. ६९,५७,०००/— रु. चा मुद्येमाल संबंधीत मुळमालकांना परत करण्यात आला. हरविलेल्या वस्तु व मोबाईल प्राप्त अर्जदारांचे चेहऱ्यावर समाधान दिसुन आले. मुद्देमाल प्राप्त सर्वांनी नागपुर शहर पोलीसांचे मन:पुर्वक आभार व्यक्त केले.

चोरीस गेलेले/हरविलेले मोबाईल तक्रारींचे तपासादरम्यान, पोलीसांनी तांत्रिक पद्धतीने सिआयआर पोर्टलवरील ट्रॅकींग प्रणाली तसेच, मिळालेल्या स्थानिक माहीतीच्या आधारे, बुद्धी कौशल्याने तपास करून तसेच, वेगवेगळ्या राज्यात व महाराष्ट्राचे अनेक जिल्हयातील वेगवेगळया ठिकाणी परस्पर जावुन, तक्रारदारांचा चोरीस गेलेला, गहाळ झालेला मुद्देमाल हस्तगत केला.

कार्यक्रमावेळी मा. पोलीस आयुक्त, नागपूर शहर यांनी परिमंडळ क्र. ४ अंतर्गत तपासी अधिकारी व अंमलदारांनी केलेल्या उल्लेखनिय कामगिरीचे कौतुक करून, त्यांचा गौरव केला. तसेच चोरीस गेलेला अथवा गहाळ झालेला मुद्येमाल शोधुन, तो कायदेशीररित्या त्यांचे मुळ मालकांना परत मिळवून देणे ही पोलीसांची अत्यंत महत्वाची जबाबदार असून, नागपूर शहर पोलीस दल ती कामगिरी उत्तमप्रकारे पार पाडत असल्याचे नमुद केले. तसेच, महिलांचे सुरक्षेकरीता लवकरच निर्भया पथक सुरु करण्यात येत असल्याचेही सांगितले.

कार्यक्रम प्रसंगी मा. श्री. विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त, नागपूर शहर, मा. श्री. वसंत परदेशी (दक्षिण विभाग), नागपूर शहर, मा. श्रीमती रश्मिता राव, पोलीस उप आयुक्त (परि. क्र ०४), मा. सहा. पोलीस आयुक्त श्री. महेश चव्हाण (सक्करदरा विभाग), श्री. नरेंद्र हिवरे (अजनी विभाग), परिमंडळ क्र. ४ अंतर्गत सर्व पोलीस ठाणेंचे प्रभारी अधिकारी आणि तपासी अधिकारी व अंमलदार तसेच, मुद्येमालाचे मुळ मालक उपस्थित होते.

नागरीकांना आवाहन करण्यात येते की, त्यांनी त्यांचे मोबाईल फोन हरविल्यास किंवा चोरीला गेल्यास नजीकच्या पोलीस ठाणे येथे तसेच, सिईआयआर पोर्टलवर तात्काळ नोंद करावी.






**<u>२) पोलीस आयुक्तालय अंतर्गत, गुन्हेगारांचा आदान—प्रदान कार्यक्रम संपन्न :—</u>**

दिनांक ०१.०९.२०२६ चे ११.०० वा., मा. पोलीस आयुक्त श्री. विश्वास नांगरे पाटील यांचे संकल्पनेतुन व मार्गदर्शनाने नागपूर पोलीस आयुक्तालय अंतर्गत विविध पोलीस ठाणे येथे अटक व मा. न्यायालयाकडून पोलीस कोठडी प्राप्त असणारे एकूण १२ अटक आरोपींचे आदान—प्रदान हे पोलीस मुख्यालय, नागपुर शहर येथील अलंकार सभागृह येथे पार पडले. आदान—प्रदान कार्यक्रमाचा मुळ उद्येश हा पोलीस अधिकारी व अंमलदार यांना आरोपींची ओळख पटावी, आरोपींची गुन्हे पध्दती समजण्यास मदत व्हावी तसेच, त्याचेवर कोणकोणते, किती व कुठे गुन्हे दाखल आहेत याबाबत माहितीचे आदान—प्रदान सुलभरितीने करता यावे असा होता. कार्यक्रम प्रसंगी मा. अपर पोलीस आयुक्त, श्री. राजेंद्र दाभाडे, मा. पोलीस उपआयुक्त (डिटेक्शन) श्री. दीपक अग्रवाल व मा. सहायक पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) श्री. वैभव जाधव हे उपस्थित होते. तसेच, एकूण २९ पोलीस ठाणे येथील अधिकारी व अंमलदार आणि आरोपींना अटक करणारे व हजर आणणारे संबंधीत पोलीस ठाणेंचे ठाणेदार, तपास पथक व एमओबी पथकातील अधिकारी व अंमलदार हजर होते. दिनांक १४.०७.२०२६ पासुन आजपावेतो एकूण १६९ अटक आरोपीतांना आदान—प्रदान मोहीमेकरीता हजर करण्यात आलेले आहे.

कार्यक्रम प्रसंगी मा. अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) यांनी सीसीसी द्वारे चालणारी कार्यपध्दती त्याचप्रमाणे सिम्बा ॲप प्रणाली समजून घेवुन, हजर आरोपींची इत्यंभुत माहिती सिंबा प्रणालीमध्ये वेळीच अद्ययावत करण्याबाबत, त्याचप्रमाणे आरोपींचा डोजीअर फार्म, फिंगरप्रिंटस्, मोडस ऑपरेंडी याबाबत माहिती प्राप्त करुन संकलित करावी. अटक आरोपीतांवर योग्य त्या प्रतिबंधक कार्यवाही कराव्यात अशा हजर ठाणे प्रभारी व तपासी अधिकारी व अंमलदार यांना सुचना दिल्या.

**<u>३) मा. न्यायालयातुन आरोपीला कारावासाची शिक्षा :—</u>**

दिनांक ०१.०९.२०२६ रोजी मा. अति. सत्र न्यायाधीश तथा विशेष न्यायाधिश एमपीआयडी कोर्ट, नागपुर, श्री. आशिष अयाचित यांनी त्यांचे कोर्टाचे विशेष केस क्र. २९७/२०२३ मधील, पोलीस ठाणे पाचपावली येथील अप. क्र. ९४३/२०२२ कलम ४२०,४०६,४०९,३४ भा.दं.वि., सहकलम ३ एमपीआयडी ॲक्ट या गुन्ह्यातील आरोपी क्र. १) श्रीमती पुष्पा सुनिल मोरघडे, वय ४९ वर्षे, रा. प्लॉट नं. ७८९, वैशाली

नगर, तथागत बुध्द विहारजवळ, नागपूर २) सुमित सुर्यभान गोरघाटे, वय ३५ वर्ष, रा. प्लॉट क्र. १७, आदर्शनगर, वाडी, खडगाव रोड, नागपुर यांचेविरूध्द साक्षी पुराव्याअंती गुन्हा शाबीत झाल्याने, **आरोपी क्र. १ यास कलम ४२० भा.दं.वि. कायद्यान्वये ०३ वर्षे कारावासाची शिक्षा व ५०००/— रू. दंड आणि दंड न भरल्यास ०३ महिने अतिरीक्त कारावासाची शिक्षा तसेच, कलम ३ एमपीआयड कायद्यान्वये ०३ वर्षे कारावासाची शिक्षा व ५,०००/— रू. दंड आणि दंड न भरल्यास ०३ महीना अतिरीक्त कारावासाची शिक्षा ठोठावली. आरोपी क्र. २ यास मा. न्यायालयाने फरारी घोषित केले आहे.**

वर नमुद आरोपीतांनी संगनमत करून 'अॅसेट सोल्युशन प्रायव्हेट लिमी.' या सॉफ्टवेअर कंपनीची निर्मीती करुन, फिर्यादी सौ. देवकु अशोकराव सोंमकुंवर वय ४९ वर्ष रा. प्लॉट क्र. १०५, ईंश्वर कोलते ले आऊट, गोधनी रोड, नागपूर व इतर चार यांना नमुद कंपनीत गुंतवणुक केल्यास प्रति महिना कमिशन व ११ महिन्यात दामदुप्पट परतावा देण्याचे आमिष दाखविले. दिनांक ०१.०३.२०२० ते ०६.०३.२०२१ चे दरम्यान, आरोपींनी फिर्यादी व इतर चार यांचेकडून वेळोवेळी एकूण ३३,५०,०००/—रु. घेऊन व त्यांना कोणताही परतावा न देता, नमुद रकमेचा अपहार करुन, फिर्यादी व इतर यांची आर्थिक फसवणुक केली. फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे पाचपावली येथे आरोपीविरूध्द गुन्हा नोंदविण्यात आला होता. आरोपी क्र. १ हिला दिनांक १४.०३.२०२३ रोजी अटक करण्यात आली होती.

गुन्ह्याचे तत्कालीन तपासी अधिकारी पोनि. राजेंद्र सानप यांनी मा. कोर्टात तपासाअंती दोषारोपपत्र सादर केले होते. सदर खटल्यात सरकारी अभियोक्ता म्हणून अॅड. श्री गिरीश दुबे यांनी तर, आरोपीतर्फे अॅड. श्री. राजु कडू यांनी काम पाहिले. सदर गुन्ह्यात कोर्ट पैरवी अधिकारी सफौ. राजेंद्र मोरई व मपोहवा. अपेक्षा बोदेले यांनी काम पाहिले.

**<u>(कामगिरी)</u>**

**<u>मानकापुर पोलीसांची कामगीरी :— वाहन चोरी करणाऱ्या आरोपीस अटक.</u>**

दिनांक २४.०८.२०२६ चे ०२.०० वा. ते ०९.०० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे मानकापुर हद्दीतील रचना गोकुळ अपार्टमेंट, फ्लॅट क्र. २०४, बी विंग येथे राहणारे फिर्यादी महेश मोतीलाल गुप्ता, वय ४६ वर्षे यांनी त्यांची अॅक्सेस मोपेड गाडी क्र. एम.एच. ३५ व्ही १४८५ किंमती अंदाजे ४०,०००/—रू. ची आपले अपार्टमेंटचे पार्कीगमध्ये लॉक करून, पार्क करून ठेवली असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीची गाडी चोरून नेली. फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे मानकापुर येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०३(२) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याचे तपासात पोलीस ठाणे मानकापुर येथील अधिकारी व अंमलदार यांनी तांत्रिक तपास करून व मिळालेल्या खात्रीशीर माहीतीवरून आरोपीस निष्पन्न केले. आरोपी नामे काशिब शेख उर्फ गोलू वल्द मोहम्मद वकील शेख, वय १९ वर्षे, रा. कब्रस्तान गल्ली, मदरसा जवळ, सलीम शेख यांचे घरी किरायाने, मोमीनपुरा, तहसील, नागपूर यास ताब्यात घेवुन विचारपुस केली असता, त्याने वर नमुद वाहन चोरीचा गुन्हा केल्याची कबुली दिली. आरोपीस अधिक सखोल विचारपूस केली असता, त्याने नमुद गुन्हयाव्यतीरिक्त पोलीस ठाणे मानकापूर हद्दीत इतर सहा ठिकाणी वाहनचोरी असे एकूण ०७ गुन्हे केल्याचे सांगितले. आरोपीकडून एकूण ०७ गुन्हे उघडकीस आणलेले असून, आरोपीचे ताब्यातुन १) काळी स्प्लेंडर गाडी क्र. एम.एच. ३१ ईएच ९१८६, २) काळी स्प्लेंडर गाडी क्र. एम.एच. ४९ सीसी २५६१, ३) ग्रे प्लेझर मोपेड गाडी क्र. एम.एच. ३१ एएन २५५२, ४) पांढरी अॅक्सेस गाडी क्र. एम.एच. ३५ व्ही १४८५, ५) पर्पल अॅक्टिवा गाडी क्र. एम.एच. ४० एएल २७३१, ६) काळी एविऐटर गाडी क्र. एम.एच. ३१ सीवाय ६७८४, ७) काळी स्प्लेंडर गाडी क्र. एम.एच. ४०

बीझेड २७०० अशा एकूण ०७ मोटारसायकली किंमती ३,४०,०००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त, मा. श्री नविनचंद्र रेड्डी, सह पोलीस आयुक्त पोलीस, मा. श्रीमती विनिता शाहु, अपर पोलीस आयुक्त उत्तर प्रभाग, मा. श्रीमती अन्नपुर्णा सिंग, पोलीस उपआयुक्त (परि.क्र. २), मा. श्री. सुनिलसिंग पवार, सहा. पोलीस आयुक्त (सदर विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली, वपोनि. हरीश काळसेकर, पोउपनि. अमित बंडगर, सुनिल डगवार, नापोअं. विजय यादव, पोअं. अनुप यादव, आशिष सातपुते, अजय घाटे व रोशन बागडे यांनी केली.



**(गुन्हे)**

**१) पोलीस ठाणे तहसील :—शस्त्र बाळगुन धुमाकुळ घालणाऱ्या आरोपीस अटक.**

दिनांक ३१.०८.२०२६ चे १९.५५ ते २०.२५ वा. चे दरम्यान, तहसील पोलीसांचे पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना माहिती मिळाली की, मेयो हॉस्पिटल चौक जवळ, रामझुल्याचे बाजुला सार्वजनिक रोडवर एक इसम हातात शस्त्र घेवून येणाऱ्या—जाणाऱ्या लोकांना शिवीगाळ करुन, धूमाकूळ घालत आहे. अशा सुचनेवरून तेथे गेले असता, मिळालेल्या वर्णनाचा इसम पोलीसांना पाहुन पळु लागला. त्यास पाठलाग करून ताब्यात घेतले व त्याचे हातातील लोखंडी शस्त्र काढुन घेतले. पंचासमक्ष त्यास त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव अली शाह वल्द शौकत शाह वय ३० वर्षे रा. गरीबनवाज मस्जिदजवळ, मोमीनपुरा, तहसील नागपूर असे सांगीतले. आरोपीचे ताब्यातुन लोखंडी टोकदार सुरी किंमती ३००/—रू. ची जप्त करण्यात आली.

आरोपी हा दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने चाकु घेवुन धुमधाम करतांना समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने सरतर्फे पोहवा. फिरोज खान यांनी दिलेल्या तक्रारीवरुन पोलीस ठाणे तहसील येथे मपोउपनि. गायत्री भरडे आरोपीविरूध्द कलम ४,२५ भा.ह.का., सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**२) पोलीस ठाणे कोराडी :— फसवणुक करणाऱ्या आरोपींविरूध्द गुन्हा दाखल.**

फिर्यादी प्रदीप कमलाकांत खसारे वय ४१ वर्षे, रा. प्लॉट क्र. १, मस्जिद रोड, बोखारा, कोराडी, नागपूर यांचे नातेवाईक रविंद्र कावलकर यांचे पत्नीला जीटी हॉस्पिटल, मुंबई येथे क्लर्क पदाची नौकरी लावुन द्यायचे असल्याने, त्याकरीता लागणारे अडव्हांस ६ लाख रुपये त्यांनी फिर्यादीकडून उधार घेतले होते. त्याचवेळी फिर्यादी यांनी त्यांचे पत्नीला सुध्दा नागपूर येथे क्लर्क पदाची नौकरी असल्यास, कळविण्यास म्हटले होते. त्यावरुन रविंद्र कावलकर यांनी त्यांचा मित्र आरोपी क्र. १) देवेंद्र साहेबराव तायडे रा. फ्लॅट क्र. ६०५, सक्सेस टॉवर, साई सत्यम पार्क, गेट क्र. १३५४/१, वाघोली पुणे हा मेडीकल हॉस्पिटल येथे क्लर्क पदाची नोकरी लावुन देतो परंतु

त्याकरीता २५ लाख रुपये लागतील असे त्यांनी फिर्यादीला सांगितले. फिर्यादी यांनी २३ लाख रुपये भरण्यास तयार असल्याचे सांगीतले. दिनांक ०३.०८.२०२४ ते दिनांक १८.०६.२०२५ चे दरम्यान, आरोपी क्र. १ ने आरोपी क्र. २) रविराजकुमार सिंग रा. फ्लॅट क्र. ३०२, करण प्राईट अपार्टमेंट, बेसा, नागपूर व ३) कुमार नावाचा इसम यांचे मार्फतीने फिर्यादीकडून त्यांचे पत्नीचे मुळ कागदपत्रे व २३ लाख रुपये रोख स्वरुपात वेळोवेळी घेतले. आरोपींनी जॉयनिंग बाबत उशिर केल्याने, फिर्यादी यांनी त्यांचे पत्नीचे जॉयनिंग बाबत आरोपींना विचारणा केली असता, आरोपीतांनी वेळोवेळी टाळाटाळ करुन, कोणतीही नौकरी लावुन दिले नाही. तसेच फिर्यादी यांनी पैसे परत मागितले असता, कोणतीही रक्कम परत केली नाही. याचप्रमाणे फिर्यादीचे नातेवाईक रविंद्र कावलकर यांचेकडून सुध्दा १४,५०,०००/—रु. घेऊन त्यांचे पत्नीला कुठेही नौकरी लावून दिली नाही. आणि कोणतीही रक्कम परत केली नाही. अशाप्रकारे आरोपीतांनी संगनमत करुन, फिर्यादी व त्यांचे नातेवाईकाचा विश्वास संपादन करुन, दोघांचेही पत्नीस नोकरी लावून देण्याचे आमिष दाखवून, त्यांचेकडून एकुण २७,५०,०००/—रु घेऊन, कोणतीही नौकरी लावून न देता व पैसे परत न करता, अन्यायाने विश्वासघात करुन आर्थिक फसवणुक केली.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे कोराडी येथे पोउपनि. तुषार नवले यांनी आरोपीविरूध्द कलम ३१८(४),३१६(२),३३६(२),३४०(२),३(५) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

**(मिसिंग)**

**पोलीस ठाणे अजनी :—** सौ. दशोदा राजेश मेहरा वय २४ वर्षे, रा. रामटेके नगर, कुणाल दुर्गेकर यांचे श्री साई हार्डवेअरचे मागील आऊट हाऊस येथे किरायाने, अजनी, नागपूर ह्या दिनांक ३०.०८.२०२६ चे ०६.४५ वा. पासुन पोलीस ठाणे अजनी हद्दीतील राहते घरी कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेल्या. घरी परत आल्या नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आल्या नाही. **वर्णन** रंग—गोरा, चेहरा—गोल, बांधा—सडपातळ, उंची—४ फुट ५ इंच, डोळे—काळे, केस—काळे लांब, अंगात— पांढरे ठिपके असलेली हिरव्या रंगाची साडी व ब्लाऊज घातलेले आहे. भाषा— हिंदी/बुंदेलखंडी बोलतात.



सौ. दशोदा

**स्वा/—**

**( अंकुश राठोड )**

**पोलीस उप निरीक्षक,**

**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**

**नागपुर शहर.**